नामपाक्र/महत्वाचे

कालमर्यादा

जा.क.शिउसं/प्राथ-२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१६

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय

दिनांकः- 27/07/2016 १६१५८

प्रति

अध्यक्ष/सचिव,

महाराष्ट्र अॅकेडमी ऑफ इंजिनियरिंग अॅन्ड एज्युकेशन रिसर्च पुणे, सर्वे. न. १२३/१२४ पौड रोड, कोथरुड पुणे ४११०३८

विषय - सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याबाबत....

संदर्भ :-१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.

२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१ दिनांक २०. जुन २०१२.

३. शासन निर्णय एसएफएस-२०१६/प्र.क्र.६९/एसएप-२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई-३ दि. १७.०६.२०१६.

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता.त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक-०३ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्तीवर परवानगी दिलेली आहे.

| शासन शादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| २५१ | पुणे | महाराष्ट्र अॅकेडमी ऑफ इंजिनियरिंग अॅन्ड एज्युकेशन रिसर्च पुणे, सर्वे. न. १२३/१२४ पौड रोड, कोथरुड पुणे ४११०३८ | डॉ. विश्वनाथ कराड विश्वशांती गुरुकुल आळंदी, गट नं. १४९/१५०, हनुमान वाडी, केळगांव तालुका-खेड, जि-पुणे | इंग्रजी | नवीन शाळा (सी.बी.एस.ई) | प्राथमिक ते माध्यमिक (इयत्ता १ ली ते १० वी ) | २०१६-१७ |

अटी व शर्ती :-

१. प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची/ तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

२. पात्र ठरलेल्या संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षांत शाळा सुरु करण्यास परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे.

३. ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्हयांच्या शिक्षणाधिका-यांकडे अर्ज करावेत

४. ज्या व्यवस्थापनास सन २०१६-१७ करिता या शासन निर्णयान्दारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पुर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच रद्दबातल ठरेल

५. सीबीएसई,आयसीएसई,आयबी,आयजीएसई,आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडाळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास /शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून परवानगी (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दिनांक २० जून २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C ) मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस मान्यता घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रप्राप्त संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C ) मिळविणेसाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तींची पुर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी ना-हरकत (N.O.C ) प्रमाणपत्र देईल.

६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशाचे,कार्यपध्दतीचे तसेच महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन )मुख्य अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

७. संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

८. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही, शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआपच रद्द समजण्यात येईल.

९. यु-डायस डाटा- या शासन निर्णयान्दारे परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/ दर्जावाढ शाळाबाबत जिल्हानिहाय U-DISE (Unified District Infofmation System For Education) मध्ये माहिती भरताना, स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुबंई यांना नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा असे जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्दारावर लावणे आवश्यक राहील.

27 JUL 2016

(दिनकर, टेमकर )
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,

१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, पुणे /अहमदनगर /सोलापूर.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

१. मा. रा.ग.गुंजाळ, उप सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२
२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.

Dr. Vishwanath Karad World Peace School, Alandi

Dr. Rashmi

Principal
Dr. Vishwanath Karad
World Peace School, Alandi

शिक्षण विभाग माध्यमिक
यशवंतराव चव्हाण भवन (जुनी इमारत)
पुणे जिल्हा परिषद पुणे सोमवार पेठ पुणे ०१
कार्या दुरध्वनी-०२०-२६०५०७३३
मेल आयडी- rmsapunezp@gmail

---

जाक्र.जिप/शिक्षण/माध्य/ १४४९ /२०२१ दि. १८/ ०३ /२०२१

परवानगी वर्ष-२०१७-२०१८
परवानगी प्रकार-दर्जावाढ
शाळा सुरु वर्ष-२०१९-२०२०

**कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी प्राप्त शाळा**
**प्रथम मान्यता**

**प्रति,**

१. अध्यक्ष/सचिव, महाराष्ट्र अॅकेडमी ऑफ ईंजिनियरिंग अॅण्ड एज्युकेशन रिसर्च पौड रोड कोथरुड पुणे
२. मुख्याध्यापक, डॉ .विश्वनाथ कराड विश्वशांती गुरुकुल आळंदी, ता.खेड

**विषय- स्वयंअर्थसहायित तत्वावर नवीन शाळेस प्रथम मान्यता देणेबाबत (९ वी व १० वी ).**

संदर्भ-१.माध्यमिक शाळा संहिता आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा स्थापना व विनियम अधिनियम-२०१२ .
२.शासन निर्णय क्र एसएफएस-१०१६/प्रक्र १४२/एसएम-२ दि.१४ जुलै २०१७.
३.शिक्षण उपसंचालक पुणे यांचेकडील पत्र जाक्र उमाशि-४०१/पुवि/१३७० दि.१२/०२/२०२०.
४.शासन निर्णय क्र एसएफएस-१०१७/प्रक्र.१६९/एय.एय-२ दि.०६/०५/२०१७.
५.संबंधित शाळेकडील प्रस्ताव दिनांक ९/२/२०२१

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की आपल्या संस्थेस महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा स्थापना व विनियमन अधिनियम -२०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणेस विदयमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी संदर्भ क्र ४ अन्वये शासन परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुसार विहित कालावधीत वर्ग सुरु करुन त्यांना मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव आपण संदर्भ क्र .५ अन्वये या कार्यालयास सादर करण्यात आलेला होता आपले प्रस्तावानुसार शाळेने पुढीलप्रमाणे वर्ग सुरु केलेले असून सदर वर्गाना खाली नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| शासन निर्णय यादीतील क्रमांक | संस्थेचे नाव | शाळेचे नाव | माध्यम | शिक्षण मंडळ | मान्यता वर्ग इय-ता व शाखा | शेरा | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शा.नि. दिनांक एसएफएस-१०१६ प्रक्र ६९/एसएम -२ दिनांक १७ जुन २०१६ | महाराष्ट्र अॅकेडमी ऑफ ईंजिनियरिंग अॅण्ड एज्युकेशन रिसर्च पौड रोड कोथरुड | डॉ .विश्वनाथ कराड विश्वशांती गुरुकुल आळंदी, ता.खेड | सीबी एसई | राज्य मंडळ | इ. ९ वी व १० वी च्या वर्गास प्रथम मान्यता | पाच वर्षासाठी | २०१९-२०२० ते २०२३-२०२४ |

**अटी व शर्ती**

१.सदर शाळेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील तरतुदीची व त्या अंतर्गत वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या सर्व नियमांची पुर्तता करणे आवश्यक आहे.

२.परवानगी देण्यात आलेल्या शाळेस,(अ) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच (ब)महाराष्ट्र स्वयंअर्थसहायित शाळा स्थापना व विनियमन अधिनियम २०१२ मधील सर्व तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.

३.संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम , शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही शासनाने ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी व मान्यता आपोआप रद् समजण्यात येईल

४.U-Dise (Unified District Information System for Education ) यु-डाईस कोड प्राप्त करुन घेणे व दरवर्षी त्यामधील माहिती अदयावत करणेची जबाबदारी संबंधित संस्था/शाळेची राहील.

Dr. Rashami
Principal
Dr. Vishwanath Karad
World Peace School, Alandi

५.सर्व संबंधिताच्या माहितीसाठी स्वयंअर्थसहायित तत्वावरील नवीन दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा असा जाहीर फलक शाळेच्या प्रवेशव्दारावर लावणे आवश्यक राहील.
६.जे वर्ग सुरु करण्यास शासनाने परवानगी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.
७.SARAL (Systematic Administrative Reforms for Achievment of Learning By Students) सरल प्रणालीवर( शाळा, विदयार्थी शिक्षक इत्यादी बाबतची ) माहिती भरणे व ती वेळोवेळी अदयवात करणे आवश्यक राहील.
८.शाळेतील आवश्यक सर्व नोंदी व अभिलेखे अदयावत ठेवून ते वेळोवेळी प्रमाणित करुन घ्यावेत.
९.वर्गामध्ये विहित प्रवेश क्षमतेच्या मर्यादेत विदयार्थ्यांना प्रवेश दयावेत पटपडताळणी/संचमान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी.
१०.शाळेत पात्रताधारक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची नियुक्ती शसनाच्या प्रचलित नियम व धोरणानुसार करावी.
११.शाळेतील नियुक्त मुख्याध्यापक अथवा शिक्षकांना खाजगी शिकवणी वर्गामध्ये काम करता येणार नाही याची दक्षता घ्यावी.
१२.व्यवस्थापकीय संस्था ही विहित केलेले नियम , मानके व प्रमाणकांनुसार शाळा चालविली जात असल्याची खात्री करुन घेईल व दर्जेदार शिक्षण देण्यास बांधील येईल.
१३.शासनाचे वतीने एखादया अधिका-यास आवश्यक असेल तेव्हा कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत केव्हाही शाळेत प्रवेश करता येईल व तिची तपासणी करता येईल.
१४.याव्दारे ज्या वर्गांना स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर मान्यता देण्यात आली आहे त्यांना भविष्यात कधीही शासकीय अनुदान तसेच कोणत्याही प्रकारचे आर्थिक साहाय्य देय असणार नाही.
१५. शालेय शुल्क निश्चित करताना महाराष्ट्र शैक्षणिक शुल्क (विनियमन )अधिनियम -२०११ आणि महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध )अधिनियम-१९८७ मधील तरतूदी तसेच शासनाने वळोवेळी विहित केलेल्या कार्यपध्दतीचे पालन करावे.
१६.शाळा बंद करणे शासनाने किमान अठरा महिन्यांची पूर्वसूचना दिल्याखेरीज स्वयंअर्थसहायित तत्वावर स्थापन केलेला शाळा बंद करता येणार नाही.
१७.एखादया शाळेने त्यांना लागू असलेल्या कायदयातील कोणत्याही तरतूदीचे किंवा नियमांचे उल्लंघन केल्यास किंवा शासनाने निर्धारित केलेली प्रमाणके किंवा मानके किंवा अटी व शर्तीची पूर्तता करणे थांबविल्यास विदयार्थ्याच्या हिताला बाधा पोचविणारी कृती केल्यास किंवा दर्जाहिन शैक्षणिक कामगिरी केल्यास शाळेची मान्यता /परवानगी काढून घेण्यात येईल.
१८.जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.०४/२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबीची पुर्तता करावी.

a) शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.(Fire Audit)
b) शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत.
c) शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.
d) सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building code of India )अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधलेली असल्याची खात्री करावी.
e) प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी.(Structural Audit)
f) ज्या मंडळाशी शाळा संलग्नित होणार आहे त्या मंडळाने विहित केलेले निकषांची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

१९.संदर्भ क्र.२ शासन निर्णय दि.१४/०७/२०१७ व संदर्भ क्र.३ शिउसं पत्र दि.१२/०२/२०२० अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन माध्यमिक शाळा संहिता कलम-४ अन्वये सदर मान्यता देण्यात येत आहे.
२०.सदरची मान्यता ही तात्पुरत्या स्वरुपाची असून पुढील पाच वर्षाकरिता लागू असेल त्यानंतर कायम मान्यता घेण्यात यावी .शाळेची प्रगती विचारात घेउन मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत विचार करणेत येईल
२१.पाच वर्षाच्या कालावधीनंतर कायमपणे मान्यता देण्याचा या कार्यालयाकडून विचार करण्यात येईल. मात्र शाळेने या आदेशातील व इतर कायदयाने घालून दिलेल्या तसेच शासनाने वेळोवेळी विहित अटी व शर्ती पूर्ण करणे चालू ठेवले पाहिजे.

Dr. Vishwanath Karad World Peace School, Alandi

१९.३.२१

( सुनंदा वाखारे)
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद पुणे

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी.
१.मा.शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे
२.विभागीय सचिव पुणे विभागीय शिक्षण मंडळ शिवाजीनगर पुणे

Dr. Rashmi
Principal
Dr. Vishwanath Karad
World Peace School, Alandi